# प्रशासक कालावधीत रायगड जिल्हा परिषद, अलिबाग सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२३/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली, त्या सभेचे इतिवृत्त

भाग -1

| अ.क्र | उपस्थित अधिकारी |
| --- | --- |
| १. | मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| २. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प., अलिबाग |
| ३. | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, रायगड-अलिबाग |
| ४. | सचिव प्रशासकीय सर्वसाधारण सभा तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र),रा.जि.प अलिबाग |
| ५. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| ६. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)रा.जि.प अलिबाग |
| ७. | कार्यकारी अभियंता (बांधकाम) रा.जि.प अलिबाग |
| ८. | कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) रा.जि.प अलिबाग |
| ९. | जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण, रा.जि.प, अलिबाग |
| १०. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता विभाग) रा.जि.प अलिबाग |
| ११. | कृषी विकास अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| १२. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| १३. | जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| १४. | समाजकल्याण अधिकारी,रा.जि.प अलिबाग |
| १५. | शिक्षणाधिकारी(प्राथ)रा.जि.प अलिबाग |
| १६. | शिक्षणाधिकारी(माध्य)रा.जि.प अलिबाग |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद म्हणाल्या की,आज मंगळवार दिनांक २३ संप्टेबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या सर्वसाधारण नियमित सभेस सभागृहात उपस्थित असलेले सर्व खाते प्रमुख, इतर विभागाचे अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेचे सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांना विषय पत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात करणेबाबत सांगितले.

**<u>विषय क्रमांक ०१ :- जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा.</u>**

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहे ऑगस्ट २०२५ अखेरचा जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा अहवाल वाचून दाखवला.

**विषय क्रमांक ०२ :- दि.१२.०६.२०२५ रोजीची तहकुब सभा दि.०२.०७.२०२५ रोजी ११.०० वाजता व नियमित सभा दि.०२.०७.२०२५ रोजी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, दि.१२.०६.२०२५ रोजीची तहकुब सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व नियमित सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास आजच्या सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, दि.१२.०६.२०२५ रोजीची तहकुब सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व नियमित सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- सामान्य प्रशासन विभाग**

**विषय क्रमांक ०३ :- विभाग निहाय आढावा**

**बांधकाम विभाग :-** कार्यकारी अभियंता(बांधकाम) यांनी बांधकाम विभागाचा आढावा दिला.

**ग्रामिण पाणी पुरवठा विभाग :-** कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) यांनी ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचा आढावा दिला.

**ग्रामपंचायत विभाग :-** उप मुख्य कार्यकारी अधिकरी (ग्रा.प.) यांनी ग्रामपंचायत विभागाचा आढावा दिला.

**आरोग्य विभाग :-** जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य विभागाचा आढावा दिला.

**महिला व बालकल्याण विभाग :-** जिल्हा कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण यांनी महिला व बालकल्याण विभागाचा आढावा दिला.

**शिक्षण विभाग (प्राथमिक) :-** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी शिक्षण (प्राथ.) विभागाचा आढावा दिला.

**शिक्षण विभाग (माध्यमिक) :-** शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शिक्षण (माध्य.) विभागाचा आढावा दिला.

**समाजकल्याण विभाग :-** जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समाजकल्याण विभागाचा आढावा दिला.

**पशुसंवर्धन विभाग :-** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी पशुसंवर्धन विभागाचा आढावा दिला.

**कृषि विभाग :-** जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी कृषि विभागाचा आढावा दिला.

**अर्थ विभाग :-** मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अर्थ विभागाचा आढावा दिला.

**पाणी व स्वच्छता विभाग :-** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी पाणी व स्वच्छता विभागाचा आढावा दिला.

**विषय (०४) :- मा.प्रशासक जि.प. यांचे अधिकारात येणाऱ्या प्रस्तांवाना मंजूरी देणे.**

**विषय (०४)०१ :- जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबत.**

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा म्हणाल्या की, जिल्हास्तरावर स्वयंसहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पदनांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यात येणार आहेत. सदर उमेद मॉल स्थापन करण्याकरीता इमारत बांधकामासाठी किमान २३,५७३ Sq.ft शासकीय जागेची निवड करण्यात आलेली आहे. सदर जागेचे ठिकाण गट क्रमांक १४३ व गट क्रमांक १४७ मधील करंजाडे तालुका पनवेल आहे. सदर जागा उपलब्ध करून देणेकरीता सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली असुन त्यानुसार शासना मार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या जागेचा मालकी हक्क सरकारी असुन सदर जागा मागणीचा प्रस्ताव करण्यात यावा. तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध झाल्यास सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलची निगराणी व देखभाल, दुरूस्ती इत्यादी (Maintenance & Repair etc.) जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडे राहिल. तसेच त्याकरीता लागणाऱ्या निधीची तरतुद जिल्हा परिषद अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येईल. याबाबत आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा विभाग**

**विषय (०४)०२ :- आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणाल्या की, आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मा.जिल्हाधिकारी सो.रायगड-अलिबाग यांचे कार्यालयामार्फत आरोग्य विभाग रा.जि.प.अलिबाग करिता नियतव्यय मंजुर करण्यात आलेले आहेत. (प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जि.रायगड याचेकडील पत्र जा.क्र. नियोजन २०२५-२६/मागणी/का.५(१)/१८०१, दि.२९.०५.२०२५

उपरोक्त पत्राच्या अनुशंगाने मंजुर नियतव्यय मधून खालील प्रमाणे आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात योजना राबविण्यासाठी व सदर मंजुर नियतव्यय अनुदान योजना निहाय खर्च करण्यासाठी मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

सदर योजनेच्या खर्चास मा.उपसंचालक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांचे कडील पत्र जा.क्र.कक्ष - ९अ/वि.औ.भां/डिपीडीसी/प्रस्ताव/तां.मंजुरी/२२४८२-८६/२०२५, दिनांक २४/०७/२०२५ नुसार तांत्रिक मान्यता देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव/कार्यक्रमाचे नाव | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मंजुर नियतव्यय (लाखात) |
|---|---|---|
| १ | संवेदनशिल आदिवासी भागात औषधे पुरवठा करणे (एटिएसपी) | ८०,००/- |
| २ | संवेदनशिल आदिवासी भागात औषधे पुरवठा करणे (माडा/मिनी माडा) | १००.००/- |
| | एकुण | १८०.००/- |

उपरोक्त योजनासाठी असलेले मंजूर नियतव्यय खर्चाच्या प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानाच्या खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- आरोग्य विभाग**

**विषय (०४)०३ :- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणाल्या की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मा.जिल्हाधिकारी सो.रायगड-अलिबाग यांचे कार्यालयामार्फत आरोग्य विभाग रा.जि.प.अलिबाग करीता नियतव्यय मंजुर करण्यात आलेले आहेत.( जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.नियोजन/कार्या-२/जिनिस/सन २०२५-२६/ मंजुर नियतव्यय/८२५/२०२५, दि.१९.०५.२०२५

उपरोक्त पत्राच्या अनुशंगाने मंजुर नियतव्येय मधून खालील प्रमाणे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना अंतर्गत मंजुर योजनांना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात योजना राबविण्यासाठी व सदर मंजूर नियतव्यय अनुदान योजना निहाय खर्च करण्यासाठी मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आलेल आहे.

सदर योजनेच्या खर्चास मा.उपचालाक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांचे कडील पत्र जा.क्र.कक्ष-९अ/वि.औ.भां/डिपीडीसी/प्रस्ताव/ता.मंजुरी/२२४९२-९६/२०२५ दि.२४.०७.२०२५ नुसार तांत्रिक मान्यता देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव/ कार्यक्रमांचे नाव | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर नियतव्यय (लाखात) |
|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी/उपकेंद्रासाठी औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करणे (२२१० H ५८१) | ३००,००/- |

उपरोक्त योजनासाठी असलेले मंजूर नियतव्यय खर्चाच्या प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन

नियुक्त केले आहे. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानाच्या खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून **जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना** सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- आरोग्य विभाग**

**विषय (०४)०४ :- सन २०२५-२६ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनेंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानातुन औषधे, साहित्य व साधनसामुग्रीचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात मंजुरी मिळणेबाबत.**

जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणाल्या की, सन २०२५-२६ करीता जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.नियोजन/ कार्या-२/जिनिस/सन २०२५-२६/मंजुर नियतव्यय/८२५/२०२५, दिनांक १९/०५/२०२५ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी/ उपकेंद्रासाठील औषधी, साहित्य व साधन सामुग्री खरेदी २२१०H ५८१ या लेखाशिर्षाखाली रक्कम रूपये ३००.०० लक्ष इतके नियतव्यय मंजुर आहे. सदर योजनेसा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आरोग्य विभाग, रायगड जिल्हा परिषद-अलिबाग अंतर्गत कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येणाऱ्या रूग्णांना औषधोपचार करण्याकरीता औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करून पुरवठा करणेकरीता खालील पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेसाठी प्रस्ताव जिल्हा परिषद सर्व साधारण सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | पुरवठा आदेश रक्कम |
|---|---|---|
| १ | M/s.National Distributors, Devrukh | २,१०,८३,९१४/- |
| २ | M/s.San Pharma, Solapur | ४३,३१,७१५/- |
| ३ | M/s.Susham Pharma, Kolhapur | ४०,४४,१४४/- |
| ४ | मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग, मंडळ, मुंबई | ५,४०,२२०/- |
| | एकुण रक्कम | २,९९,९९,९९३/- |
| | | |

सदर योजनेतुन जिल्हायातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करून पुरवठा करणेकरीता वरील तक्त्यामधील अ.क्र.१ ते ४ या पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेकरीता सदर खरेदी प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे. त्यानुसार वरील तक्त्यामधील अ.क्र. १ ते ४ या पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनेंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानातुन औषधे, साहित्य व साधनसामुग्रीचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- आरोग्य विभाग.**

**विषय (०४)०५ :- रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता घेणे बाबत.**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, जिल्हा परिषद रायगड अंतर्गत शासनाच्या योजना तसेच जिल्हा परिषद मार्फत असलेल्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्या योजनांच्या अनुषगांने करण्यात येणा-या कामांना प्रसिध्दी देण्यासाठी तसेच जनता व जिल्हा परिषद यांच्यात समन्वय साधण्यासाठी तसेच सोशल मिडीया प्रसिध्दी करणे साठी मानधनी तत्वावर जनसंपर्क अधिकारी म्हणुन श्री. प्रणय पाटील यांची नेमणुक करणे आली होती. त्यांचा अकरा महिन्यांचा कार्यकाल संपुष्टात आल्याने नविन नेमणुक मानधनी तत्वावर करणे बाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले आहेत.

तथापी सदर नेमणुकीसाठी चा विषय जिल्हा परिषद सवर्साधारण सभेसमोर प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर नेमणुक बाबतच्या प्रस्तावातील अटी व शर्तीचा तपशीलाचे प्रारूप खालील प्रमाणे

| अटी व शर्ती | |
|---|---|
| १. | **शैक्षणीक अर्हता** |
| | (अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. |
| | (ब) मान्यता प्राप्त विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम ५०टक्के पेक्षा अधिक टक्केवारीसह उत्तीर्ण होऊन पुर्ण केलेला असावा. |
| २ | अनुभव |
| | (अ) उमेदवाराने जिल्हांस्तरावरील "अ" व "ब" दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये पाच वर्ष काम केल्याचा अनुभव असावा. यामध्ये किमान तीन वर्ष अर्जदाराने "अ"दर्जाच्या वृत्तपत्रात काम केलेले असावे. |
| | (ब) कोणत्याही संस्थेकडुन सामजिक कार्यकर्ता प्रशिक्षण घेऊन सामाजिक कार्यकर्ता म्हणुन समाजसेवेचा अनुभव असावा. |
| ३. | जिल्हा परिषदेने ठरवून दिलेल्या मासिक मेहनताना रक्कम रू. २००००/- प्रमाणे काम करणे अर्जदारास बंधनकारक राहिल. |
| ४. | नियुक्त अर्जदारास अदा केली जाणारी मासिक मेहनताना रक्कम ही रोजंदारी स्वरूपाची असल्याने नियुक्त अर्जदाररस नियमित जिल्हा परिषद कर्मचारी संबोधले जाणार नाही. सबब त्याला कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही वेळेस शासकीय सेवेत कायम करण्याबाबत दावा करता येणार नाही. तसेच कोणत्याही क्षणी त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद,यांना असणार आहे. |
| ५. | अर्जदाराने अर्ज करण्याच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीव्दारे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा.तसेच अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती जोडाव्यात.विहीत मुदतीत प्राप्त आणि शैक्षणिक अर्हता प्राप्त अशा पात्र अर्जदारांच्या अर्जांचाच विचार मुलखतीसाठी ग्राहय धरला जाईल. |
| ६. | मुलाखतीच्या दिनांक,वेळ आणि ठिकाण याबाबतचा तपशिल अर्जदारांस पत्राने कळविला जाईल. |
| ७. | सदर नियुक्ती करणे जिल्हा परिषदेला बंधनकारक नाही. सबब याबाबत अर्जदारास कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. याची नोंद अर्जदारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी घेण्याची आहे. |
| ८. | वरील सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच अर्जदाराने आपला अर्ज सामान्य प्रशासन विभाग कार्यालय रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे सादर करावा.<br>उक्त अ.क्र.३ मध्ये नमुद मासिक रक्कम रू.२००००/- प्रमाणे ११ महिन्याच्या एकुण रक्कम रूपये २,२०,०००/- लेखाशिर्ष् २००७७ कंत्राटी व मानधनी व्यावसाईक सेवा या लेखाशिर्षामधून करण्याबाबत आणि अन्य सर्व अटी व शर्ती निश्चित करण्यासाठी अगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेसमोर विषय प्रस्तावित करण्यासाठी नस्ती सविनय सादर |

उक्त अ.क्र.३ मध्ये नमुद मासिक रक्कम रू.२००००/-प्रमाणे ११ महिन्याच्या एकुण रक्कम रूपये २,२०,०००/-लेखाशिर्ष २००७७ कंत्राटी व मानधनी व्यावसाईक सेवा या लेखाशिर्षामधून करण्याबाबत आणि अन्य सर्व अटी व शर्ती निश्चिती व नेमणुक करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला आहेत. परंतू जिल्हा परिषदेची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदया प्रशासकीय कालावधी असल्याने व ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी

यांना जिल्हा परिषदेच्या सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तरी आजच्या सभेने रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता घेणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- सामान्य प्रशासन विभाग.**

**विषय (०४)०६ :- निर्लेखित वाहनाऐंवजी नविन वाहन खरेदी १२ लक्ष किंमत मर्यादेनुसार करणे बाबत.**

( गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरूड,पोलादपुर ,अलिबाग, पेण , पनवेल, रोहा, महाड,खालापुर,सुधागड -पाली म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव यांचेकडील वाहन तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी सा.प्र व ग्रा.प,मुख्य लेखा व वित्त अधिकारी कडील वाहने. )

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरूड,पोलादपुर ,अलिबाग, पेण , पनवेल, रोहा, महाड, खालापुर,सुधागड -पाली यांचेकडील वाहन तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी सा.प्र व ग्रा.प यांचे कडील वाहनांचे चे निर्लेखनासाठी च्या प्रस्तावास मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे.पंचायत समिती म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव यांचेकडील वाहन तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजिप यांचे कडील वाहनाचे प्रस्ताव निर्लेखन करून नविन खरेदीसाठी मा. विभागीय आ ुयक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहेत. परंतु सदर वाहनाचे निर्लेखन करून नविन वाहन खरेदीचा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडील श.नि. वाहन २०२४/प.क्र.११//विनियम/दि.२/०२/२०२४ नुसार ८ लक्ष किंमत मर्यादेत नविन वाहन खरेदी करण्याबाबत सादर करण्यात आला होता. त्यानुसार जि.प स्थायी समिती अन्वये ठराव घेण्यात आले होते.

तथापि वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्याने शासनाचे वित्त विभागाकडील शा.नि. वाहन २०२५/ प.क्र.१९/ विनियम/ दि.१७/०९/२०२५ नुसार राज्य स्तरीय वाहन आढावा समितीच्या मान्यते वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी यांना १२ लक्ष **(वाहनाची किंमत मध्ये वस्तू व सेवा कर+टेम्परारी रजिस्ट्रेशन+मोटार वाहन कर +नोंदणी शुल्क समाविष्ट नाही** ) पर्यंत खरेदी ची मर्यादा वाढविण्यात आली आहे. त्यामुळे दि. **१७/०९/२०२५ च्या शासन निर्णयानुसार र.रू १२.०० लक्ष किंमत मर्यादेत वाहन खरेदी करण्यासाठी** वाढीव मर्यादेनुसार नविन वाहन खरेदी करणेसाठी जि.प सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतु ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ सप्टेंबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक म्हणुन मला असलेल्या अधिकारात वाहनाचे निर्लेखन करून १२ लक्ष किमंत मर्यादेत जि.प घसारा निधीतुन नविन वाहन खरेदीच्या प्रस्तावास आजच्या सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून निर्लेखित वाहनाऐंवजी नविन वाहन खरेदी १२ लक्ष किंमत मर्यादेनुसार करणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- सामान्य प्रशासन विभाग.**

**विषय (०४)०७ :- कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे ता.अलिबाग**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे. ता.अलिबाग या कामास जि.प.सेस या लेखाशिर्षांतर्गत रायगड जिल्हा परिषद प्रशासकीय मान्यता आदेश क्र.३७१ अन्वये रक्कम रू.१,००,००,०००/- प्रशासकी मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग या कार्यालयाकडून दिनांक-१७/०७/२०२५ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये चक्रपाणी परशुराम म्हात्रे मु.पेझारी (ढोलपाडा) पो.पोयनाड ता.अलिबाग (१८ ००% कमी दराने रक्कम रू.८१९५,३९३/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक-०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतु दिनांक २०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/ प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक -१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासकीय नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरील निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे. ता.अलिबाग या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक चक्रपाणी परशुराम म्हात्रे मु.पेझारी (ढोलपाडा) पो.पोयनाड ता.अलिबाग यांच्या निविदेस आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे ता.अलिबाग याबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग.**

**विषय (०४)०८ :- रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२०२५ च्या वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेबाबत...**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक प्रशासन अहवाल सादर करण्यात आलेला असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १४२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करणे) नियम १९६६ व १९८१ नुसार रायगड जिल्हा परिषदेच्या प्रशासन अहवाल वरील नियमांच्या कलम ६(२) नुसार सदर प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे.

रायगड जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि. २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक अ-मध्य उप-विभाग दि. ११ मार्च २०२२ नूसार प्रशासक म्हणून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि. २१/०३/२०२२ पासून प्राधिकृत केले असून त्यांना जिल्हा परिषदेचे सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने सदर वार्षिक प्रशासन अहवालास आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२०२५ च्या वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- सामान्य प्रशासन विभाग.**

**विषय (०४)०९ :- ता.महाड व माणगाव येथील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये (Major District Road) दर्जोन्नती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत..**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी महाड व माणगाव तालुक्यातील महाड विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमधील काही ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यावर प्रवासी वाहतूक, शालेय व आरोग्यविषयक वाहतूक तसेच औद्योगिक व पर्यटन उदिष्टांसाठी वापर मोठया प्रमाणात होत असल्याचे तसचे सदर रस्त्यांची सद्यस्थिती पाहता त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये दर्जोन्नती करणेबाबत मा.ना.श्री.भरतशेठ गोगावले, मंत्री-रोहयो,फलोत्पादन,खारभुमी यांनी सदर रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्ता म्हणून दर्जोन्नती करण्याची शिफारस केली आहे. तरी संबंधित ग्रामीण व इतर जिल्हा रस्त्यांच्या दर्जोन्तीसाठी नाहरकत दाखला देण्याची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.५ व ६ अन्वये उप अभियंता बांधकाम,राजिप,उप विभाग माणगाव व महाड यांसकडील अहवालानुसार सदर रस्ते ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे कळविण्यात आले आहे.

परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ मध्ये उप विभाग दि.११ मार्च २०२२ नुसार रायगड जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि.२०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आल्याने दि.२१/०३/२०२२ पासून प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे व सदर प्रशासकीय कालावधीत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग दि.१३ सप्टेंबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.रायगड यांना प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यानुसार माणगाव व महाड तालुक्यातील सदर ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत रायगड जिल्हा परिषदेची सर्वसाधारण समितीची प्रशासकिय सभा सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

रस्त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचा दर्जा व क्रमांक | रस्त्याचे नाव | अस्तित्वातील रस्ता | नवीन लांबी | निव्वळ लांबी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इ.जि.मा.१४९ | गोंडाळे ते नडगाव कांबळे तर्फे बिरवाडी ते इजिमा ला मिळणारा मार्ग.ता.महाड | ८.०० | ४.०० | १२.०० |
| २ | इ.जि.मा.१५२ | विन्हेरे शिरसवण कुंभारडे कावळे ते रा.मा.९६ ला मिळणारा मार्ग, ता.महाड | ९.०० | ०.०० | ९.०० |
| ३ | ग्रा.मा.२ | वसाप ते खरबकोंड गिजेवाडी मानेचीधार ते पोलादपूर जिल्हा हद्द, ता.महाड | ३.५० | २.५० | ६.०० |
| ४ | ग्रा.मा.३८ | महाड पंढरपूर माग ते कोल, कोथेरी, तांडलेकरवाडी, जंगमवाडी ते रा.मा.१७, ता.महाड | ५.५० | ४.५० | १०.०० |
| ५ | ग्रा.मा.४९ | गोंडाळे मांडवकरवाडी, ता.महाड | ०.८० | ०.०० | ०.८० |
| ६ | ग्रा.मा.५७ | रा.मा.९६ ते काळकाईकोंड पायरीकोंड मार्ग, ता.महाड | ६.५० | ०.०० | ६.५० |
| ७ | ग्रा.मा.५९ | रा.मा.९६ ते खर्डी तरडेवाडी मार्ग, ता.महाड | २.५० | २.५० | ५.०० |
| ८ | ग्रा.मा.६१ | रा.मा.९६ नेराव सुतारवाडी मार्ग (महाड), ता.महाड | ४.५० | १.५० | ६.०० |
| ९ | ग्रा.मा.६६ | रा.मा.१०१ ते पाने जोड मार्ग, ता.महाड | २.०० | ०.०० | २.०० |
| १० | ग्रा.मा.६७ | रा.मा.१०१ ते पंदेरी दापोली मार्ग, ता.महाड | ४.०० | ०.०० | ४.०० |
| ११ | ग्रा.मा.६८ | रा.मा.१०१ ते वाघोली नेवाळी जोड मार्ग, ता.महाड | ३.०० | ३.०० | ६.०० |
| १२ | ग्रा.मा.१५६ | चांढवे गणेशवाडी मार्ग, ता.महाड | ०.८० | ०.८० | १.६० |
| १३ | ग्रा.मा.१५९ | कोथेरी वडाचाकोंड मार्ग, ता.महाड | २.०० | २.०० | ४.०० |
| १४ | ग्रा.मा.२२८ | पाने ते कडसरी लिंगाणा नवीन वसाहत मार्ग, ता.महाड | १.५० | ४.५० | ६.०० |
| १५ | ग्रा.मा.२६१ | खर्डी नगर भुवन रस्ता, ता.महाड | ३.०० | ०.०० | ३.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | ग्रा.मा.३०३ | नगर भुवन ते खडकी रस्ता, ता.महाड | २.०० | २.०० | ४.०० |
| १७ | ग्रा.मा.३२२ | नेराव सुतारवाडी रस्ता, ता.महाड | १.५० | ०.०० | १.५० |
| १८ | ग्रा.मा.३३७ | पोटलेवाडी ते वाघोली, ता.महाड | ०.०० | ३.०० | ३.०० |
| १९ | ग्रा.मा.१९८ | खर्डी ते नेराव सुतारवाडी ते उर्डेवाडी मार्ग,ता.माणगाव | ५.०० | १.०० | ६.०० |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ता.महाड व माणगाव येथील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये (Major District Road) दर्जोन्नती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग.**

**विषय (०४)१० :- ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचात हद्दितील विकास कामे करण्याकरीता जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्ज मंजुरी बाबत.**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.प.) म्हणाले की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती महाड यांनी ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामे करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर विकास कामे करण्याकरीता रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २९/१२/२०२३ ठराव क्र.७८/०१ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | जमा | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५१७०३०२ | ५१०९९१७ | ६०३८५ |
| २०२३-२४ | ३९८३९०७ | ३८५०९२४ | १३२९८३ |
| २०२४-२५ | ७५४२८४१ | ४१६२९०४ | ३३७९९३७ |
| | | एकुण:- | ३५७३३०५/- |

सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विन उत्पादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु.११९११०२/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु.२३८२२०४०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता. महाड यांनी रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीला रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) ग्रामपंचायतीस रक्कमे इतके कर्ज मंजुर करता येईल.

महाराष्ट्र शासन राजपत्र, ग्राम विकास विभाग, दिनांक - ११ मार्च २०२२ अन्वये कर्जास मंजूरी देण्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना आहेत.तरी ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता. महाड यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कमरु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) इतक्या रक्कमेचे कर्ज आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचात हद्दितील विकास कामे करण्याकरीता जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्ज मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- ग्रामपंचायत विभाग.**

**विषय (०४)११ :- जिल्हा सर्वसाधारण समितीकडील जिल्हा परिषद सेस सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास मंजुरी देणेबाबत**

म्हणाले की, ग्रामविकास विभागाकडील शासननिर्णय क्र/झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दिनांक ०७-१०-२०१७ चे भाग-२ अन्वये न्यूनतम रक्कम रू.५०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा सर्वसाधारण समिती सभेस आहेत.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबत महाराष्ट्र शासन, कृषि,पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक पसं/प्र २०२४/प्र.क ०१/पदुम-१ मंत्रालय, मुंबई-४०००३०-दिनांक-१०/१०/२०२४ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदान केलेले आहे.

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, असाधारण भाग-१ अ, उपविभाग, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई, दिनांक ११.०३.२०२२ व दिनांक १३.०९.२०२२ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणून अधिकार प्रदान केलेले आहे.

त्यानुसार पशुसंवर्धन विभागाकडील सन २०२५-२६ चे जिल्हा परिषेद सेस अंतर्गत न्यूनतम रक्कम रू.१०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता पशुसंवर्धन विभागाकडील सन २०२५-२६ च्या सुधारीत अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास जिल्हा परिषद सेस अंतर्गत खालील दिलेल्या योजना बाबनिहाय जिल्हा सर्वसाधारण समितीने सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | अंदाजपत्रकीय बाब लेखशीर्ष | संगणक संकेतांक | सन २०२५-२६ चा प्रथम सुधारीत अर्थसंकल्प |
|---|---|---|---|
| १ | पशुवैद्यकीय दवाखाने दुरूस्ती व देखभाल | १२३१ | ७५,००,०००/- |
| २ | औषधे,लसी व वैद्यकीय उपकरणे खरेदी | १२३२ | १,१८,९८,०००/- |
| ३ | खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वाचा पुरवठा | १२५७ | ९०,८०,०००/- |
| ४ | पशुवैद्यकीय दवाखान्यांची विद्युत, दूरध्वनी व भाडे देयके अदा करणे | १२६१ | १२,००,०००/- |
| ५ | पशुसंवर्धन विभाग आधीनस्त कार्यालये, दवाखान्यांची आधुनिकीकरण व बळकटीकरण अंतर्गत फर्निचर,संगणक, साहित्य, उपकरणे व इतर आनुषंगिक खरेदी | १२६२ | २५,००,०००/- |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा सर्वसाधारण समितीकडील जिल्हा परिषद सेस सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास मंजुरी देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- पशुसंवर्धन विभाग.**

**विषय (०४)१२ :- सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

जिल्हा समाजकल्याण अधिकारी म्हणाले की, सन २०२५-२६ जिल्हा परिषद सेस ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत प्रथम सुधारीत अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे निधी मंजुर केलेला आहे.

| अ.क्र. | योजनेंचे नाव | लेखाशिर्ष | प्रथम सुधारिकत अर्थसंकल्प तरतुद | एकुण तरतुद (रक्कम रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | दिव्यांग व्यक्तींसाठी थेरपी सेंटर उभारणी | २२३५-०१६४ | २,६५,४२,०००/- | २,६५,४२,०००/- |

ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीढ-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दि.०७.१०.२०१७ चे भाग-२ अन्वये रू.५०,००,००१/- लक्षा पासुन पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यानुसार सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील जिल्हा परिषद ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत रू.५०,००,००१/- लक्षापासून पुढील योजनांना प्रशासकीय मान्याता देण्यात यावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- समाजकल्याण विभाग.**

**विषय (०४)१३ :- सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना तांत्रिक मान्यता मिळणेबाबत.**

जिल्हा समाजकल्याण अधिकारी म्हणाले की, सन २०२५-२६ जिल्हा परिषद सेस ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत प्रथम सुधारीत अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे निधी मंजुर केलेला आहे.

| अ.क्र. | योजनेंचे नाव | लेखाशिर्ष | प्रथम सुधारिकत अर्थसंकल्प तरतुद | एकुण तरतुद (रक्कम रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | दिव्यांग व्यक्तींसाठी थेरपी सेंटर उभारणी | २२३५-०१६४ | २,६५,४२,०००/- | २,६५,४२,०००/- |

ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीढ-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दि.०७.१०.२०१७ चे भाग-२ अन्वये रू.५०,००,००१/- लक्षा पासुन पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यानुसार सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील जिल्हा परिषद ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत रू.५०,००,००१/- लक्षापासून पुढील योजनांना तांत्रिक मान्याता देण्यात यावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना तांत्रिक मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- समाजकल्याण विभाग**

**विषय (०४)१४ :- सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षाखालील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मंजूरी देणेबाबत.**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) म्हणाल्या की, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये पुरवणी अर्थ संकल्पास मान्यता दिल्यानुसार शिक्षण विभागाकरीता सुधारीत तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे शिक्षण विभागाकडील खालील योजनेच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | संगणक सांकेतांक | मुळ अर्थसंकल्प मंजुर तरतूद | प्रथम सुधारीत अर्थसंकल्प | पुर्नविनियोजनाव्दारे (-) केलेली तरतूद | पुर्नविनियोजनाव्दारे (+) केलेली तरतूद | पुर्नविनियोजनाव्दारे एकूण मंजूर तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आदर्श शिक्षक जिल्हा पुरस्कार | २२०२-०१०२ | २०००००० | १००० | १९९९००० | १०००००० | १००१००० |
| २ | नाविन्यपूर्ण योजना (राजिप प्राथ, शाळांना cctv, tv,digital e-larning) इतर अनुषंगिक कामे | | २५१२६००० | २५१२६००० | १०००००० | ० | २४१२६००० |

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यानुसार वरील योजनेचे पुर्नविनियोजन करण्यासाठी ही जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाल्या की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षाखालील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मंजूरी देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- शिक्षण (प्राथमिक) विभाग**

**विषय (०४)१५ :- जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबत.**

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा म्हणाल्या की, जिल्हास्तरावर स्वयंसहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यात येणार आहेत. सदर उमेद मॉल स्थापन करण्याकरीता इमारत बांधकामासाठी किमान ११३७५ Sq.ft

शासकीय जागेची निवड करण्यात आलेली आहे. सदर जागेचे ठिकाण गट क्रमांक ६२/अ/१ उतेखोल तालुका माणगाव आहे. सदर जागा उपलब्ध करून देणेकरिता सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यानुसार शासना मार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या जागेचा मालकी हक्क सरकारी असुन सदर जागा मागणीचा प्रस्ताव करण्यात यावा. तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध झाल्यास सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलची निगराणी व देखभाल, दुरूस्ती इत्यादी (Maintenance & Repair etc.) जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडे राहिल. तसेच त्याकरीता लागणाऱ्या निधीची तरतुद जिल्हा परिषद अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येईल. याबाबत आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा विभाग**

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, आजच्या सभेत देणेंत आलेल्या सुचना प्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी व पुर्तता त्वरीत करणेंत यावी. तरी आजची सभा चांगल्या पध्दतीने पार पडली. तरी मी सर्वाचे आभार मानतो व आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

(जालिंदर पठारे)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**तथा सचिव**
**रायगड जिल्हा परिषद,अलिबाग**

**सही/-**
**(नेहा भोसले) भा.प्र.से.**
**प्रशासक तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

I

**दिनांक २३/०९/२०२५ रोजी मंगळवारी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात जिल्हा परिषदेची नियमित प्रशासकीय सर्वसाधारण सभा घेणेंत आली, त्या सभेचे इतिवृत्त भाग-२**

| सभेची तारीख | प्रस्तावांचा विषय | प्रस्तावाचा मजकूर | प्रस्ताव सुचविणारा अनुमोदक यांचे नांव | दुरुस्ती कोणतीही असल्यास मजकुर | दिलेल्या मतांची संख्या | | | दुरुस्त्या मतदानानंतर अंतिम दुरुस्त्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सुचक | अनुमोदक | बाजूने | विरुध्द | तटस्थ | मजकूर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

**दि.२३/०९/२०२५ रोजीची नियमित प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंगळवारी सकाळी ११.०० वाजता**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक:-०१**<br>जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा. | पूर्तता:-<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढाव घेण्यात आला. |
| **विषय क्र. ०२**<br>दि.१२.०६.२०२५ रोजीची तहकुब सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व नियमित सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | प्रशासकीय आदेश क्रमांक:-३७७<br>दि.१२.०६.२०२५ रोजीची तहकुब सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व नियमित सभा दि.०२.०७.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देत आहे.<br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर |
| **विषय क्रमांक:- ०३**<br>विभाग निहाय आढावा | पूर्तता:-<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभाग निहाय आढावा घेण्यात आला. |
| **विषय (०४) :- मा.प्रशासक जि.प. यांचे अधिकारात येणाऱ्या प्रस्तांवाना मंजूरी देणे.**<br>**विषय (०४)०१ :- जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबंत.** | प्रशासकीय आदेश क्रमांक:-३७८<br>जिल्हास्तरावर स्वयंसहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पदनांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यात येणार आहेत. सदर उमेद मॉल स्थापन करण्याकरीता इमारत बांधकामासाठी किमान २३,५७३ Sq.ft शासकीय जागेची निवड करण्यात आलेली आहे. सदर जागेचे ठिकाण गट क्रमांक १४३ व गट क्रमांक १४७ मधील करंजाडे तालुका पनवेल आहे. सदर जागा उपलब्ध करून देणेकरीता सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली असुन त्यानुसार शासना मार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या जागेचा मालकी हक्क सरकारी असुन सदर जागा मागणीचा प्रस्ताव करण्यात यावा. तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध झाल्यास सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलची निगराणी व देखभाल, दुरूस्ती इत्यादी (Maintenance & Repair etc.) जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडे राहिल. तसेच त्याकरीता लागणाऱ्या निधीची तरतुद जिल्हा परिषद अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येईल. याबाबत आजच्या सभेने मंजुरी दयावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)०२ :- आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्रमांक:-३७९

आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मा.जिल्हाधिकारी सो.रायगड-अलिबाग यांचे कार्यालयामार्फत आरोग्य विभाग रा.जि.प.अलिबाग करिता नियतव्यय मंजुर करण्यात आलेले आहेत. (प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जि.रायगड याचेकडील पत्र जा.क्र. नियोजन २०२५-२६/मागणी/का.५(१)/१८०१, दि.२९.०५.२०२५

उपरोक्त पत्राच्या अनुशंगाने मंजुर नियतव्यय मधून खालील प्रमाणे आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात योजना राबविण्यासाठी व सदर मंजुर नियतव्यय अनुदान योजना निहाय खर्च करण्यासाठी मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

सदर योजनेच्या खर्चास मा.उपसंचालक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांचे कडील पत्र जा.क्र.कक्ष - ९अ/वि.औ.भां/डिपीडीसी/प्रस्ताव/तां.मंजुरी/२२४८२-८६/२०२५, दिनांक २४/०७/२०२५ नुसार तांत्रिक मान्यता देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव/कार्यक्रमाचे नाव | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मंजुर नियतव्यय (लाखात) |
|---|---|---|
| १ | संवेदनशिल आदिवासी भागात औषधे पुरवठा करणे (एटिएसपी) | ८०,००/- |
| २ | संवेदनशिल आदिवासी भागात औषधे पुरवठा करणे (माडा/मिनी माडा) | १००.००/- |
| | एकुण | १८०.००/- |

उपरोक्त योजनासाठी असलेले मंजूर नियतव्यय खर्चाच्या प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानाच्या खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रम अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)०३ :- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८०

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मा.जिल्हाधिकारी सो.रायगड-अलिबाग यांचे कार्यालयामार्फत आरोग्य विभाग रा.जि.प.अलिबाग करीता नियतव्यय मंजुर करण्यात आलेले आहेत.( जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.नियोजन/कार्या-२/जिनिस/सन २०२५-२६/ मंजुर नियतव्यय/८२५/२०२५, दि.१९.०५.२०२५

उपरोक्त पत्राच्या अनुशंगाने मंजुर नियतव्येय मधून खालील प्रमाणे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना अंतर्गत मंजुर योजनांना सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात योजना राबविण्यासाठी व सदर मंजूर नियतव्यय अनुदान योजना निहाय खर्च करण्यासाठी मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आलेल आहे.

सदर योजनेच्या खर्चास मा.उपचालाक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांचे कडील पत्र जा.क्र.कक्ष-९अ/वि.औ.भां/डिपीडीसी/प्रस्ताव/ता.मंजुरी/२२४९२-९६/२०२५ दि.२४.०७.२०२५ नुसार तांत्रिक मान्यता देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव/ कार्यक्रमांचे नाव | सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर नियतव्यय (लाखात) |
|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी/उपकेंद्रासाठी औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करणे (२२१० H ५८९) | ३००,००/- |

उपरोक्त योजनासाठी असलेले मंजूर नियतव्यय खर्चाच्या प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानाच्या खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून **जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजुर योजना** सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

१९६१ (सन १९६२ च्या ५) मधील कलम ९१ ब व ७५ ब या कलमान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन उक्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्य पार पाडण्यासाठी दिनांक २० मार्च २०२२ पासून पुढील चार महिन्यापर्यंत किंवा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे निवडणुकीद्वारे भरले जातील यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत प्राधिकृत केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२४-२५ अंतर्गत शेती विषयक सुधारीत अवजारे ७५% अनुदानाने पुरविणे या योजनेस तांत्रिक मान्यता देणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा

प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)०४ :- सन २०२५-२६ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनेंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानातुन औषधे, साहित्य व साधनसामुग्रीचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात मंजुरी मिळणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८१

सन २०२५-२६ करीता जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.नियोजन/कार्या-२/जिनिस/सन २०२५-२६/मंजुर नियतव्यय/८२५/२०२५, दिनांक १९/०५/२०२५ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी/उपकेंद्रासाठील औषधी, साहित्य व साधन सामुग्री खरेदी २२१०H ५८१ या लेखाशिर्षाखाली रक्कम रूपये ३००.०० लक्ष इतके नियतव्यय मंजुर आहे. सदर योजनेसा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आरोग्य विभाग, रायगड जिल्हा परिषद-अलिबाग अंतर्गत कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येणाऱ्या रूग्णांना औषधोपचार करण्याकरीता औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करून पुरवठा करणेकरीता खालील पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेसाठी प्रस्ताव जिल्हा परिषद सर्व साधारण सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | पुरवठा आदेश रक्कम |
|---|---|---|
| १ | M/s.National Distributors, Devrukh | २,१०,८३,९१४/- |
| २ | M/s.San Pharma, Solapur | ४३,३१,७१५/- |
| ३ | M/s.Susham Pharma, Kolhapur | ४०,४४,१४४/- |
| ४ | मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग, मंडळ, मुंबई | ५,४०,२२०/- |
| | एकुण रक्कम | २,९९,९९,९९३/- |

सदर योजनेतुन जिल्हायातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करून पुरवठा करणेकरीता वरील तक्त्यामधील अ.क्र.१ ते ४ या पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेकरीता सदर खरेदी प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

त्यानुसार वरील तक्त्यामधील अ.क्र. १ ते ४ या पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १३७ नुसार आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून सन २०२५-२६ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनेंतर्गत मंजुर नियतव्यय अनुदानातुन औषधे, साहित्य व साधनसामुग्रीचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)०५ :- रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता घेणे बाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८२

जिल्हा परिषद रायगड अंतर्गत शासनाच्या योजना तसेच जिल्हा परिषद मार्फत असलेल्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्या योजनांच्या अनुषगांने करण्यात येणा-या कामांना प्रसिध्दी देण्यासाठी तसेच जनता व जिल्हा परिषद यांच्यात समन्वय साधण्यासाठी तसेच सोशल मिडीया प्रसिध्दी करणे साठी मानधनी तत्वावर जनसंपर्क अधिकारी म्हणुन श्री. प्रणय पाटील यांची नेमणुक करणे आली होती. त्यांचा अकरा महिन्यांचा कार्यकाल संपुष्टात आल्याने नविन नेमणुक मानधनी तत्वावर करणे बाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले आहेत.

तथापी सदर नेमणुकीसाठी चा विषय जिल्हा परिषद सवर्साधारण सभेसमोर प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर नेमणुक बाबतच्या प्रस्तावातील अटी व शर्तीचा तपशीलाचे प्रारूप खालील प्रमाणे

| अटी व शर्ती | |
|---|---|
| १. | शैक्षणीक अर्हता |
| | (अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. |
| | (ब) मान्यता प्राप्त विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम ५०टक्के पेक्षा अधिक टक्केवारीसह उत्तीर्ण होऊन पुर्ण केलेला असावा. |
| २ | अनुभव |
| | (अ) उमेदवाराने जिल्हांस्तरावरील "अ" व "ब" दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये पाच वर्ष काम केल्याचा अनुभव असावा. यामध्ये किमान तीन वर्ष अर्जदाराने "अ" दर्जाच्या वृत्तपत्रात काम केलेले असावे. |
| | (ब) कोणत्याही संस्थेकडुन सामजिक कार्याकर्ता प्रशिक्षण घेऊन सामाजिक कार्यकर्ता म्हणुन समाजसेवेचा अनुभव असावा. |
| ३. | जिल्हा परिषदेने ठरवून दिलेल्या मासिक मेहनताना रक्कम रू. २००००/- प्रमाणे काम करणे अर्जदारास बंधनकारक राहिल. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | |
|---|---|
| ४. | नियुक्त अर्जदारास अदा केली जाणारी मासिक मेहनताना रक्कम ही रोजंदारी स्वरूपाची असल्याने नियुक्त अर्जदाररास नियमित जिल्हा परिषद कर्मचारी संबोधले जाणार नाही. सबब त्याला कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही वेळेस शासकीय सेवेत कायम करण्याबाबत दावा करता येणार नाही. तसेच कोणत्याही क्षणी त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद,यांना असणार आहे. |
| ५. | अर्जदाराने अर्ज करण्याच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीव्दारे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा.तसेच अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती जोडाव्यात.विहीत मुदतीत प्राप्त आणि शैक्षणिक अर्हता प्राप्त अशा पात्र अर्जदारांच्या अर्जांचाच विचार मुलखतीसाठी ग्राहय धरला जाईल. |
| ६. | मुलाखतीच्या दिनांक,वेळ आणि ठिकाण याबाबतचा तपशिल अर्जदारांस पत्राने कळविला जाईल. |
| ७. | सदर नियुक्ती करणे जिल्हा परिषदेला बंधनकारक नाही. सबब याबाबत अर्जदारास कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. याची नोंद अर्जदारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी घेण्याची आहे. |
| ८. | वरील सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच अर्जदाराने आपला अर्ज सामान्य प्रशासन विभाग कार्यालय रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे सादर करावा.<br>उक्त अ.क्र.३ मध्ये नमुद मासिक रक्कम रू.२००००/- प्रमाणे ११ महिन्याच्या एकुण रक्कम रूपये २,२०,०००/- लेखाशिर्ष २००७७ कंत्राटी व मानधनी व्यावसाईक सेवा या लेखाशिर्षामधून करण्याबाबत आणि अन्य सर्व अटी व शर्ती निश्चित करण्यासाठी अगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेसमोर विषय प्रस्तावित करण्यासाठी नस्ती सविनय सादर |

उक्त अ.क्र.३ मध्ये नमुद मासिक रक्कम रू.२००००/-प्रमाणे ११ महिन्याच्या एकुण रक्कम रूपये २,२०,०००/-लेखाशिर्ष २००७७ कंत्राटी व मानधनी व्यावसाईक सेवा या लेखाशिर्षामधून करण्याबाबत आणि अन्य सर्व अटी व शर्ती निश्चिती व नेमणुक करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला आहेत. परंतू जिल्हा परिषदेची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदया प्रशासकीय कालावधी असल्याने व ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ संप्टेंबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तरी आजच्या सभेने रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता दयावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रायगड जिल्हा परिषदेसाठी जनसंपर्क अधिकारी मानधन तत्वावर नेमणे साठी मान्यता घेणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा

प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

<table>
<tr><th>१</th><th>२</th><th>३</th><th>४</th><th>५</th><th>६</th><th>७</th><th>८</th><th>९</th><th>१०</th><th>११</th></tr>
<tr><td colspan="3">विषय (०४)०६ :- निर्लेखित वाहनाऐंवजी नविन वाहन खरेदी १२ लक्ष किंमत मर्यादेनुसार करणे बाबत.<br>( गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरूड,पोलादपुर ,अलिबाग, पेण , पनवेल, रोहा, महाड, खालापुर, सुधागड -पाली, म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव यांचेकडील वाहन तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी सा.प्र व ग्रा.प,मुख्य लेखा व वित्त अधिकारी कडील वाहने. )</td><td colspan="8"><u>प्रशासकीय आदेश क्र. :- ३८३</u><br>गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरूड,पोलादपुर ,अलिबाग, पेण , पनवेल, रोहा, महाड, खालापुर,सुधागड -पाली यांचेकडील वाहन तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी सा.प्र व ग्रा.प यांचे कडील वाहनांचे चे निर्लेखनासाठी च्या प्रस्तावास मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे.पंचायत समिती म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव यांचेकडील वाहन तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजिप यांचे कडील वाहनाचे प्रस्ताव निर्लेखन करून नविन खरेदीसाठी मा. विभागीय आ्युक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहेत. परंतु सदर वाहनाचे निर्लेखन करून नविन वाहन खरेदीचा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडील श.नि. वाहन २०२४/प.क्र.११//विनियम/दि.२/०२/२०२४ नुसार ८ लक्ष किंमत मर्यादेत नविन वाहन खरेदी करण्याबाबत सादर करण्यात आला होता. त्यानुसार जि.प स्थायी समिती अन्वये ठराव घेण्यात आले होते.<br>तथापि वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्याने शासनाचे वित्त विभागाकडील शा.नि. वाहन २०२५/ प.क्र.१९/ विनियम/ दि.१७/०९/२०२५ नुसार राज्य स्तरीय वाहन आढावा समितीच्या मान्यते वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी यांना १२ लक्ष (वाहनाची किंमत मध्ये वस्तू व सेवा कर+टेम्पररी रजिस्ट्रेशन+मोटार वाहन कर +नोंदणी शुल्क समाविष्ट नाही ) पर्यंत खरेदी ची मर्यादा वाढविण्यात आली आहे. त्यामुळे दि. १७/०९/२०२५ च्या शासन निर्णयानुसार र.रू १२.०० लक्ष किंमत मर्यादेत वाहन खरेदी करण्यासाठी वाढीव मर्यादेनुसार नविन वाहन खरेदी करणेसाठी जि.प सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतु ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दिनांक ११ मार्च २०२२ व १३ सप्टेंबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक म्हणुन मला असलेल्या अधिकारात वाहनाचे निर्लेखन करून १२ लक्ष किमंत मर्यादेत जि.प घसारा निधीतुन नविन वाहन खरेदीच्या प्रस्तावास आजच्या सभेने मान्यता दयावी.<br>तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून निर्लेखित वाहनाऐंवजी नविन वाहन खरेदी १२ लक्ष किंमत मर्यादेनुसार करणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
<tr><td colspan="3">विषय (०४)०७ :- कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे ता.अलिबाग</td><td colspan="8"><u>प्रशासकीय आदेश क्र. :- ३८४</u><br>कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे. ता.अलिबाग या कामास जि.प.सेस या लेखाशिर्षातर्गत रायगड जिल्हा परिषद प्रशासकीय मान्यता आदेश क्र.३७१ अन्वये रक्कम रू.१,००,००,०००/- प्रशासकी मंजुरी देणेत आलेली आहे.<br>बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग या कार्यालयाकडून दिनांक-१७/०७/२०२५ अन्वये निविदा मागविल्या असता</td></tr>
</table>

<table>
<tr><th>१</th><th>२</th><th>३</th><th>४</th><th>५</th><th>६</th><th>७</th><th>८</th><th>९</th><th>१०</th><th>११</th></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="8">त्यामध्ये चक्रपाणी परशुराम म्हात्रे मु.पेझारी (ढोलपाडा) पो.पोयनाड ता.अलिबाग (१८ ००% कमी दराने रक्कम रू.८१९५,३९३/-) ने प्राप्त झालेली आहे.<br><br>महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक-०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतु दिनांक २०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/ प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक -१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासकीय नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरील निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे. ता.अलिबाग या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक चक्रपाणी परशुराम म्हात्रे मु.पेझारी (ढोलपाडा) पो.पोयनाड ता.अलिबाग यांच्या निविदेस आजच्या सभेने मंजुरी दयावी.<br><br>तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कुंटेबाग येथे रायगड जिल्हा परिषद विषय समिती सभागृह बांधकाम करणे ता.अलिबाग याबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br><br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
<tr><td colspan="3">विषय (०४)०८ :- रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२०२५ च्या वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेबाबत...</td><td colspan="8">प्रशासकीय आदेश क्र. :- ३८५<br><br>रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक प्रशासन अहवाल सादर करण्यात आलेला असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १४२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करणे) नियम १९६६ व १९८१ नुसार रायगड जिल्हा परिषदेच्या प्रशासन अहवाल वरील नियमांच्या कलम ६(२) नुसार सदर प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br><br>रायगड जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि. २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक अ-मध्य उप-विभाग दि. ११ मार्च २०२२ नूसार प्रशासक म्हणून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि. २१/०३/२०२२ पासून प्राधिकृत केले असून त्यांना जिल्हा परिषदेचे सर्व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने सदर वार्षिक प्रशासन अहवालास आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळावी.<br><br>तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२०२५ च्या वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br><br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमतें मंजूर</td></tr>
</table>

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**विषय (०४)०९ :- ता.महाड व माणगाव येथील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये (Major District Road) दर्जोन्नती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत..**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी महाड व माणगाव तालुक्यातील महाड विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमधील काही ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यावर प्रवासी वाहतूक, शालेय व आरोग्यविषयक वाहतूक तसेच औद्योगिक व पर्यटन उदिष्टांसाठी वापर मोठया प्रमाणात होत असल्याचे तसचे सदर रस्त्यांची सद्यस्थिती पाहता त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये दर्जोन्नती करणेबाबत मा.ना.श्री.भरतशेठ गोगावले, मंत्री-रोहयो,फलोत्पादन,खारभुमी यांनी सदर रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्ता म्हणून दर्जोन्नती करण्याची शिफारस केली आहे. तरी संबंधित ग्रामीण व इतर जिल्हा रस्त्यांच्या दर्जोन्तीसाठी नाहरकत दाखला देण्याची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.५ व ६ अन्वये उप अभियंता बांधकाम,राजिप,उप विभाग माणगाव व महाड यांसकडील अहवालानुसार सदर रस्ते ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे कळविण्यात आले आहे.

परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ मध्ये उप विभाग दि.११ मार्च २०२२ नुसार रायगड जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि.२०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आल्याने दि.२१/०३/२०२२ पासून प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे व सदर प्रशासकीय कालावधीत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग दि.१३ सप्टेंबर २०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.रायगड यांना प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यानुसार माणगाव व महाड तालुक्यातील सदर ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत रायगड जिल्हा परिषदेची सर्वसाधारण समितीची प्रशासकिय सभा सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

रस्त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचा दर्जा व क्रमांक | रस्त्याचे नाव | अस्तित्वातील रस्ता | नवीन लांबी | निव्वळ लांबी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इ.जि.मा.१४९ | गोंडाळे ते नडगाव कांबळे तर्फे बिरवाडी ते इजिमा ला मिळणारा मार्ग.ता.महाड | ८.०० | ४.०० | १२.०० |
| २ | इ.जि.मा.१५२ | विन्हेरे शिरसवण कुंभारडे कावळे ते रा.मा.९६ ला मिळणारा मार्ग, ता.महाड | ९.०० | ०.०० | ९.०० |
| ३ | ग्रा.मा.२ | वसाप ते खरबकोंड गिजेवाडी मानेचीधार ते पोलादपूर जिल्हा हद्द, ता.महाड | ३.५० | २.५० | ६.०० |
| ४ | ग्रा.मा.३८ | महाड पंढरपूर माग ते कोल, कोथेरी, तांडलेकरवाडी, जंगमवाडी ते रा.मा.१७, ता.महाड | ५.५० | ४.५० | १०.०० |
| ५ | ग्रा.मा.४९ | गोंडाळे मांडवकरवाडी, ता.महाड | ०.८० | ०.०० | ०.८० |
| ६ | ग्रा.मा.५७ | रा.मा.९६ ते कांळकाईकोंड पायरीकोंड मार्ग, ता.महाड | ६.५० | ०.०० | ६.५० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७ | ग्रा.मा.५९ | रा.मा.९६ ते खर्डी तरडेवाडी मार्ग, ता.महाड | | २.५० | २.५० | ५.०० | |
| | | | ८ | ग्रा.मा.६१ | रा.मा.९६ नेराव सुतारवाडी मार्ग (महाड), ता.महाड | | ४.५० | १.५० | ६.०० | |
| | | | ९ | ग्रा.मा.६६ | रा.मा.१०१ ते पाने जोड मार्ग, ता.महाड | | २.०० | ०.०० | २.०० | |
| | | | १० | ग्रा.मा.६७ | रा.मा.१०१ ते पंदेरी दापोली मार्ग, ता.महाड | | ४.०० | ०.०० | ४.०० | |
| | | | ११ | ग्रा.मा.६८ | रा.मा.१०१ ते वाघोली नेवाळी जोड मार्ग, ता.महाड | | ३.०० | ३.०० | ६.०० | |
| | | | १२ | ग्रा.मा.१५६ | चांढवे गणेशवाडी मार्ग, ता.महाड | | ०.८० | ०.८० | १.६० | |
| | | | १३ | ग्रा.मा.१५९ | कोथेरी वडाचाकोंड मार्ग, ता.महाड | | २.०० | २.०० | ४.०० | |
| | | | १४ | ग्रा.मा.२२८ | पाने ते कडसरी लिंगाणा नवीन वसाहत मार्ग, ता.महाड | | १.५० | ४.५० | ६.०० | |
| | | | १५ | ग्रा.मा.२६१ | खर्डी नगर भुवन रस्ता, ता.महाड | | ३.०० | ०.०० | ३.०० | |
| | | | १६ | ग्रा.मा.३०३ | नगर भुवन ते खडकी रस्ता, ता.महाड | | २.०० | २.०० | ४.०० | |
| | | | १७ | ग्रा.मा.३२२ | नेराव सुतारवाडी रस्ता, ता.महाड | | १.५० | ०.०० | १.५० | |
| | | | १८ | ग्रा.मा.३३७ | पोटलेवाडी ते वाघोली, ता.महाड | | ०.०० | ३.०० | ३.०० | |
| | | | १९ | ग्रा.मा.१९८ | खर्डी ते नेराव सुतारवाडी ते उर्डेवाडी मार्ग,ता.माणगाव | | ५.०० | १.०० | ६.०० | |

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ता.महाड व माणगाव येथील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांची प्रमुख जिल्हा रस्त्यामध्ये (Major District Road) दर्जोन्नती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)१० :- ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचात हद्दितील विकास कामे करण्याकरीता जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्ज मंजुरी बाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८७

गट विकास अधिकारी, पंचायत समिती महाड यांनी ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामे करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर विकास कामे करण्याकरीता रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २९/१२/२०२३ ठराव क्र.७८/०१ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | जमा | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५१७०३०२ | ५१०९९१७ | ६०३८५ |
| २०२३-२४ | ३९८३९०७ | ३८५०९२४ | १३२९८३ |
| २०२४-२५ | ७५४२८४१ | ४१६२९०४ | ३३७९९३७ |
| | | एकुण:- | ३५७३३०५/- |

<table>
<tr><th>१</th><th>२</th><th>३</th><th>४</th><th>५</th><th>६</th><th>७</th><th>८</th><th>९</th><th>१०</th><th>११</th></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="8">सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विन उप्तादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु.११९११०२/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु.२३८२२०४०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता. महाड यांनी रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीला रक्कम रु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) ग्रामपंचायतीस रक्कमे इतके कर्ज मंजुर करता येईल.<br><br>महाराष्ट्र शासन राजपत्र, ग्राम विकास विभाग, दिनांक - ११ मार्च २०२२ अन्वये कर्जास मंजूरी देण्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना आहेत.तरी ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता. महाड यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कमरु. ६९,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसत्तर लाख मात्र) इतक्या रक्कमेचे कर्ज आजच्या सभेने मंजुरी दयावी.<br><br>तरीविभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रुप ग्रामपंचायत सवाणे ता.महाड यांनी ग्रामपंचात हद्दितील विकास कामे करण्याकरीता जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्ज मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br><br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
<tr><td colspan="3">विषय (०४)११ :- जिल्हा सर्वसाधारण समितीकडील जिल्हा परिषद सेस सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास मंजुरी देणेबाबत</td><td colspan="8"><u>प्रशासकीय आदेश क्र. :- ३८८</u><br><br>ग्रामविकास विभागाकडील शासननिर्णय क्र/झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दिनांक ०७-१०-२०१७ चे भाग-२ अन्वये न्यूनतम रक्कम रू.५०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा सर्वसाधारण समिती सभेस आहेत.<br><br>पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागची पुनर्रचना व आकृतीबंधाबाबत महाराष्ट्र शासन, कृषि,पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक पसं/प्र २०२४/प्र.क ०१/पदुम-१ मंत्रालय, मुंबई-४०००३०-दिनांक-१०/१०/२०२४ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदान केलेले आहे.<br><br>ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, असाधारण भाग-१ अ, उपविभाग, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई, दिनांक ११.०३.२०२२ व दिनांक १३.०९.२०२२ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणून अधिकार प्रदान केलेले आहे.</td></tr>
</table>

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

त्यानुसार पशुसंवर्धन विभागाकडील सन २०२५-२६ चे जिल्हा परिषद सेस अंतर्गत न्यूनतम रक्कम रू.१०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता पशुसंवर्धन विभागाकडील सन २०२५-२६ च्या सुधारीत अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास जिल्हा परिषद सेस अंतर्गत खालील दिलेल्या योजना बाबनिहाय जिल्हा सर्वसाधारण समितीने सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | अंदाजपत्रकीय बाब लेखशीर्ष | संगणक संकेतांक | सन २०२५-२६ चा प्रथम सुधारीत अर्थसंकल्प |
|---|---|---|---|
| १ | पशुवैद्यकीय दवाखाने दुरूस्ती व देखभाल | १२३१ | ७५,००,०००/- |
| २ | औषधे,लसी व वैद्यकीय उपकरणे खरेदी | १२३२ | १,१८,९८,०००/- |
| ३ | खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वाचा पुरवठा | १२५७ | ९०,८०,०००/- |
| ४ | पशुवैद्यकीय दवाखान्यांची विद्युत, दूरध्वनी व भाडे देयके अदा करणे | १२६१ | १२,००,०००/- |
| ५ | पशुसंवर्धन विभाग आधीनस्त कार्यालये, दवाखान्यांची आधुनिकीकरण व बळकटीकरण अंतर्गत फर्निचर,संगणक, साहित्य, उपकरणे व इतर आनुषंगिक खरेदी | १२६२ | २५,००,०००/- |

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा सर्वसाधारण समितीकडील जिल्हा परिषद सेस सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प तरतुदीच्या खर्चास मंजुरी देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)१२ :- सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३८९

सन २०२५-२६ जिल्हा परिषद सेस ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत प्रथम सुधारीत अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे निधी मंजुर केलेला आहे.

| अ.क्र. | योजनेंचे नाव | लेखाशिर्ष | प्रथम सुधारिकत अर्थसंकल्प तरतुद | एकुण तरतुद (रक्कम रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | दिव्यांग व्यक्तींसाठी थेरपी सेंटर उभारणी | २२३५-०१६४ | २,६५,४२,०००/- | २,६५,४२,०००/- |

| १ | २ | ३ | ४ ५ ६ ७ ८ ९ १० ११ |
|---|---|---|---|
| | | | ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीढ-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दि.०७.१०.२०१७ चे भाग-२ अन्वये रू.५०,००,००१/- लक्षा पासुन पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.<br>ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.<br>त्यानुसार सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील जिल्हा परिषद ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत रू.५०,००,००१/- लक्षापासून पुढील योजनांना प्रशासकीय मान्याता देण्यात यावी.<br>तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर |
| **विषय (०४)१३ :- सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना तांत्रिक मान्यता मिळणेबाबत.** | | | प्रशासकीय आदेश क्र. :- ३९०<br>सन २०२५-२६ जिल्हा परिषद सेस ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत प्रथम सुधारीत अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे निधी मंजुर केलेला आहे. |

| अ.क्र. | योजनेंचे नाव | लेखाशिर्ष | प्रथम सुधारिकत अर्थसंकल्प तरतुद | एकुण तरतुद (रक्कम रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | दिव्यांग व्यक्तींसाठी थेरपी सेंटर उभारणी | २२३५-०१६४ | २,६५,४२,०००/- | २,६५,४२,०००/- |

ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीढ-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दि.०७.१०.२०१७ चे भाग-२ अन्वये रू.५०,००,००१/- लक्षा पासुन पुढील योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यानुसार सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील जिल्हा परिषद ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत रू.५०,००,००१/- लक्षापासून पुढील योजनांना तांत्रिक मान्याता देण्यात यावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ मधील समाज कल्याण विभागाकडील ५% जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण निधी रक्कम रू.५०.०० लक्ष पुढील योजनांना तांत्रिक मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा
प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**विषय (०४)१४ :- सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षाखालील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मंजूरी देणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३९१

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये पुरवणी अर्थ संकल्पास मान्यता दिल्यानुसार शिक्षण विभागाकरीता सुधारीत तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे शिक्षण विभागाकडील खालील योजनेच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | संगणक सांकेतांक | मुळ अर्थसंकल्प मंजुर तरतूद | प्रथम सुधारीत अर्थसंकल्प | पुर्नविनियोजनाव्दारे (-) केलेली तरतूद | पुर्नविनियोजनाव्दारे (+) केलेली तरतूद | पुर्नविनियोजनाव्दारे एकूण मंजूर तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आदर्श शिक्षक जिल्हा पुरस्कार | २२०२-०१०२ | २०००००० | १००० | १९९९००० | १०००००० | १००१००० |
| २ | नाविन्यपूर्ण योजना (राजिप प्राथ, शाळांना cctv, tv,digital e-larning) इतर अनुषंगिक कामे | | २५१२६००० | २५१२६००० | १०००००० | ० | २४१२६००० |

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, आरक्षण भाग-एक-अ, उपविभाग ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दि.११/०३/२०२२ व दि.१९/०९/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यानुसार वरील योजनेचे पुर्नविनियोजन करण्यासाठी ही जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मंजुरी दयावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षाखालील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी मंजूरी देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा

प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय (०४)१५ :- जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबत.**

प्रशासकीय आदेश क्र. :- ३९२

जिल्हास्तरावर स्वयंसहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यात येणार आहेत. सदर उमेद मॉल स्थापन करण्याकरीता इमारत बांधकामासाठी किमान ११३७५ Sq.ft शासकीय जागेची निवड करण्यात आलेली आहे. सदर जागेचे ठिकाण गट क्रमांक ६२/अ/१ उतेखोल तालुका माणगाव आहे. सदर जागा उपलब्ध करून देणेकरिता सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यानुसार शासना मार्फत

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीतून उमेद मॉल इमारत बांधण्याचे निश्चित करण्यात आले. बांधकामा करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या जागेचा मालकी हक्क सरकारी असुन सदर जागा मागणीचा प्रस्ताव करण्यात यावा. तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध झाल्यास सदर जागेवर उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलची निगराणी व देखभाल, दुरूस्ती इत्यादी (Maintenance & Repair etc.) जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडे राहिल. तसेच त्याकरीता लागणाऱ्या निधीची तरतुद जिल्हा परिषद अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येईल. याबाबत आजच्या सभेने मंजुरी दयावी.<br>तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा स्तरावर उमेद मॉल स्थापित करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br><br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर | | | | | | | |

([illegible])
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
तथा सचिव
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

सही/-
(नेहा भोसले) भा.प्र.से.
प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग